Maharashtra Times, Sunday, 6th March, 2011, Page No. 11

# विज्ञान दिन...
# परंपरेकडे वाटचाल?

राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा झाला. वैज्ञानिक कार्यक्रमांना हजारोंच्या संख्येने गर्दी झाली. बदलत्या भारताचे हे प्रतिबिंब असल्याची प्रतिक्रिया या चित्रामुळे व्यक्त होऊ शकते. वास्तव मात्र खरंच असं आहे का?

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा झाला. वर्षभर कडक सुरक्षा व्यवस्थेत असणाऱ्या देशभरातील संशोधन संस्था, प्रयोगशाळा या दिवशी सर्वसामान्यांसाठी दिवसभर खुल्या होत्या. शाळा, कॉलेजांमध्ये विज्ञान प्रदर्शनांचे आयोजन झाले. वैज्ञानिक कार्यक्रमांना हजारोंच्या संख्येने गर्दी झाली. बदलत्या भारताचे हे प्रतिबिंब असल्याची प्रतिक्रिया या चित्रामुळे व्यक्त होऊ शकते. वास्तव मात्र खरच असं आहे का?

स्वातंत्र्यानंतर भारताची जडण घडण विज्ञान तंत्रज्ञानाच्या आधारावर होणार असल्याचे पंडित नेहरुंनी सूचित केले. आणि सीएसआयआर, अणू ऊर्जा आयोग, आयआयटीसारख्या संस्थांचा विकास करून ते प्रत्यक्षात उतरवलेही. त्यांच्या या पुढाकारामुळे स्वतंत्र भारतात विज्ञानाचे अधिष्ठान असणारी एक पिढीच निर्माण झाली. त्या पिढीने ९० च्या दशकापर्यंत देशाचा वैज्ञानिक विकास केला. दरम्यानच्या काळात मात्र, सर्व वैज्ञानिक संस्थांत आणि विद्यापीठांत ज्या प्रमाणात शास्त्रज्ञांची भर पडणे आवश्यक होते, त्या प्रमाणात ती पडली नाही आणि २१ वे शतक सुरु होईपर्यंत देशात शास्त्रज्ञ, तंत्रज्ञांची मोठी टंचाई निर्माण झाली आहे. इतर क्षेत्रांतील तुलनेनी चांगली संधी, भारतीय संस्थांमधील सरकारी कारभार आणि समाजात विज्ञानाविषयीची अनास्था ही त्यामागील मुख्य कारणे होती.

## विज्ञान दिनाची पार्श्वभूमी

१९८६ मध्ये 'नॅशनल कौन्सिल फॉर सायन्स अँड टेक्नॉलॉजी कम्युनिकेशन'ने (एनसीएसटीसी) २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून जाहीर करण्याची केंद्राला शिफारस केली. पहिले नोबेल विजेते भारतीय शास्त्रज्ञ सर सी. व्ही. रामन यांच्या नोबेल विजेत्या संशोधनाचा (रामन इफेक्ट) दिवस म्हणून या दिवसाचे महत्व सांगण्यात आले. १९८७ पासून देशात २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा करण्यात येऊ लागला. पुढे केंद्रीय विज्ञान तंत्रज्ञान विभागाने (डीएसटी) पुढाकार घेऊन या दिवशी होणाऱ्या उपक्रमांची व्याप्ती वाढवली. देशभरातील संशोधन संस्थांची दारे या दिवशी सर्वसामान्यांसाठी खुली झाली.

## पुणे आणि विज्ञान दिन

आयएमडी, आयआयटीएम, एनसीएल, आयुका, डीआरडीओ, एनसीसीएस, सी-डॅक, एनसीआरए, एनआयव्ही, नारी, पुणे विद्यापीठ, आयसर आदी ३० पेक्षा अधिक संशोधन संस्थांमुळे पुण्याला देशाची वैज्ञानिक राजधानी मानले जाते. त्यामुळे पुण्यातील विज्ञान दिन हा सुद्धा वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. आयुकाच्या स्थापनेनंतर ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी संस्थेच्याअंतर्गत स्वतंत्र विज्ञान प्रसार विभाग सुरु केला. या विभागांतर्गत वर्षभर विद्यार्थी व सर्वसामान्यांना विज्ञानाकडे आकर्षित करणारे आणि त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणारे कार्यक्रम राबवले जातात. विज्ञान दिनाच्या दिवशी या संस्थेतील कार्यक्रमांना जत्रेचे स्वरुप येते. पालक अगदी आपल्या पहिली, दुसरीतल्या मुलांना घेऊन येथील कार्यक्रमांना आवर्जून उपस्थिती लावतात, दुर्बिणींच्यामागे रांगा लावतात, शालेय विद्यार्थी उत्साहाने शास्त्रज्ञांशी संवाद साधतात. गेली सुमारे १५ वर्षे हा उपक्रम उत्साहात सुरु आहे.



नारायणगाव जवळील 'जीएमआरटी' प्रकल्पालाही दर विज्ञान दिनाच्या दिवशी शहरी आणि ग्रामीण भागातून सुमारे २० हजार जण भेट देतात. पुण्यात विज्ञान दिनाला अक्षरशः 'विज्ञान वारी'चे स्वरुप आले आहे. देशातील इतर शहरांपेक्षा विज्ञानाच्या बाबतीत पुण्याची जागरूकता वैशिष्ट्यपूर्ण आहे.

## खरंच काही साधलं जातं का?

समाजात वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्याबरोबर विद्यार्थ्यांना मुलभूत विज्ञानाकडे आकर्षित करणे हा या दिवसाचा मुख्य हेतू. मात्र, खरच तो साध्य होतो का, यावर कोणी सकारात्मक उत्तर आजतरी देऊ शकणार नाही. एका दिवसाच्या उपक्रमांनी हे साध्य होणे शक्य नसले, तरी किमान विज्ञानाविषयीची जागरूकता निर्माण होणे यातून अपेक्षित आहे.

एका मुलाखतीत डॉ. नारळीकरांनी याबाबत चिंता व्यक्त केली होती. शालेय जीवनात विज्ञानाचे कुतूहल असणारे, विविध विज्ञान प्रकल्प उत्साहात करणारे विद्यार्थी पुढे जाऊन अंधश्रद्धाळू होत असल्याचे दिसून आल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदवले होते.'असे का घडते? आम्हीच (शास्त्रज्ञ) कुठेतरी कमी पडतो, किंवा माध्यमांच्या माऱ्यामुळे निर्माण झालेल्या वातावरणाचा तो परिणाम असावा.' असा निष्कर्ष डॉ. नारळीकरांनी काढला होता. त्यांची चिंताच विज्ञान दिन आणि त्या प्रकारच्या विज्ञान प्रसारक उपक्रमांसमोरील आजचे आव्हान आहे. दुसरीकडे 'आयटी' आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा वाढता कल, कमी गुणांमुळे अपरिहार्यपणे मुलभूत विज्ञानाकडे वळणारे विद्यार्थी यामुळे विज्ञान दिन सुरु होण्याआधीची आव्हाने विज्ञान प्रसाराकांसमोर आणखी तीव्रतेने उभी आहेत.

## २८ फेब्रुवारी कोणाच्या सोयीचा?

विज्ञान दिनाची तारीख हा अगदी पहिल्यापासून वादाचा मुद्दा राहिला आहे. या दिवशी सादर होणारे बजेट हा यामागील मुख्य आक्षेप होता. मात्र, रामन यांनी आधी शोध लावला, की बजेट आधी सुरु झाले, हा प्रश्न उपस्थित करून शास्त्रज्ञांनी आपली बाजू पक्की केली होती. आता मात्र हा दिवस सोयीस्कर नसल्याची तक्रार संशोधन संस्था, शिक्षक, विद्यार्थी अशा सर्व स्तरांतून होत आहे.

दहावी आणि बारावीचया परीक्षांमुळे फेब्रुवारी मध्यापासूनच देशभरातील शाळांचे शिक्षक परीक्षांच्या प्रक्रियेत अडकतात. इतर इयत्तांचे विद्यार्थीही परीक्षेच्या तयारीला लागलेले असतात. उन्हाळा सुरु झाल्यामुळे दिवसभर उन्हाच्या झळा सहन कराव्या लागतात. मुलांच्या परीक्षा असल्यामुळे पालकही पुढाकार घेत नाहीत अशा स्थितीत विज्ञान दिन कार्यक्रमांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. या शिवाय संशोधन संस्थांमध्ये सुरु असणारे ऑडिट, कॉलेजमध्ये सुरु असणाऱ्या सबमिशन्समुळे स्वयंसेवकांची कमतरता अशा अनेक समस्यांमुळे २८ फेब्रुवारी ही तारीख अडचणीची ठरत आहे.

## १४ नोव्हेंबरसाठी अभियान

राष्ट्रीय विज्ञान दिन १४ नोव्हेंबरला घेणे संयुक्तिक ठरेल असे मत पुण्यातील काही विज्ञान प्रसारकांनी सुचवले. १४ नोव्हेंबर रोजी भारताचा वैज्ञानिक पाया रचणाऱ्या पंडित नेहरुंचा जन्म दिवस आहेच आणि याच दिवशी भारताच्या तिरंग्याची मोहोर चंद्रावर उमटली होती. १४ नोव्हेंबरलाच चांद्रयानावरील भारतीय उपकरणांनी चंद्रावरील पाण्याचा शोध लावला होता. इस्रोच्या २० हजार संशोधकांचे एकत्रित यश असणाऱ्या या मोहिमेमुळे भारतात एक नवे वैज्ञानिक पर्व सुरु झाले. राष्ट्रीय विज्ञान दिनासाठी हा दिवस कारण आणि वेळ दोन्ही दृष्टीने योग्य असल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. पुढील वर्ष राष्ट्रीय विज्ञान वर्ष जाहीर झाले आहे. तेव्हा पासून हा बदल प्रत्यक्षात यावा यासाठी सह्यांची मोहिमही सुरु करण्यात आली आहे.

● मयुरेश प्रभुणे
mayuresh.prabhune@timesgroup.com